**कार्यालय वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**देहुरोड पोलीस ठाणे**
**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पिंपरी पुणे**
**दुरध्वनी** 020-27671288/ 91-8317271288
**Email :- psdehuroad.pcpc-mh@gov.in**

| | | |
|---|---|---|
| **जावक क्रमांक -** /2024 | **देहुरोड पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड** | **दिनांक** 28/07/2024 |

## प्रेस नोट दि. 28/07/2024

आज दि. 27/07/2024 रोजी महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथक पुणे तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय दहशतवाद विरोधी पथक व देहुरोड पोलीस ठाणे यांचे संयुक्तिक कारवाई दरम्यान देहुरोड पोलीस ठाणे हद्दीमध्ये इसम नामे - 1) शाहीद उर्फ सोहिददुल उर्फ स्माईली कालुस्लाम शेख, शाहीदइस्लाम वय 35 रा घर नं 86 एम बी कॅम्प मदीना मजीद जवळ पुणे मुळगांव राकाई शहर, बुथीदंग, तुंगबजार, पोलीस ठाणे तुंगबाजार, म्यानमार व आरोपी 2) मुज्जमील मोहमद अमीन खान वय 43 रा. पंडित चाळ, गांधीनगर, देहूरोड, मुळगांव नांगचंग, तहसील मगदू, जि. रेकॉग, म्यानमार, हे सन 2015 पासून व आरोपी 3) साजिदा कासीम शेख उर्फ साजिदा शाहीद शेख वय 24 रा घर नं 86 एम बी कॅम्प मदीना मजीद जवळ पुणे मुळगांव राकाई शहर, बुथीदंग, तुंगबजार, पोलीस ठाणे तुंगबाजार, म्यानमार आरोपी 4) शफीका मुज्जमिल आमिन खान रा. पंडित चाळ, गांधीनगर, देहूरोड, मुळगांव नांगचंग, तहसील मगदू, जि. रेकॉग, म्यानमार हे म्यानमार देशाचे नागरीक असुन कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्रांशिवाय तसेच भारत म्यानमार सीमेवरील मुलकी आधिका-यांच्या लेखी परवानगीशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन तसेच त्यांचेकडे म्यानमार देशातुन भारतामध्ये प्रवेश करतांना रेफुज्यी म्हणुन कोणताही वैध दाखला नसतांना देहुरोड पुणे येथे सन 2012 पासून ते आजपर्यंत अवैधरित्या वास्तव्य करतांना मिळुन आले म्हणुन त्यांचे विरोधात कलम 14,14(अ),14(ब),14(क), विदेशी व्यक्ती अधिनियम 1946 सह कलम 12 पासपोर्ट अधिनियम 1967 सह कलम 3(अ) पारपत्र 1950 प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी क्र. 01 व 02 यांना दाखल गुन्हयात दि. 27/07/2024 रोजी अटक करण्यात आली असुन त्यांना दि. 31/07/2024 रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आली असुन अधिक तपास चालु आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट राज्य दहशतवाद विरोधी पथक पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय दहशतवाद विरोधी पथक तसेच देहुरोड पोलीस ठाणे यांचे संयुक्तीक कार्यवाही अन्वये करण्यात आली आहे.